# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : **www.unipune.ac.in**
इ-मेल: dyracademic@unipune.ac.in

संदर्भ : शैप्र/३१६४

दिनांक : १८/०८/२०१६

## परिपत्रक क्र. - १३५/२०१६

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या खालील विद्याशाखांतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांचे प्रवेश हे केंद्रीय प्रवेश पद्धतीने (Centralised Admission Process) मा. संचालक, तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचेमार्फत केले जातात.

१) अभियांत्रिकी
२) व्यवस्थापनशास्त्र
३) वास्तुशास्त्र
४) औषधनिर्माणशास्त्र

ज्या महाविद्यालयांमध्ये उपरोक्त विद्याशाखेअंतर्गत असलेले अभ्यासक्रम राबविले जातात अशा महाविद्यालयातील अभ्यासक्रमांना विनाअट संलग्नीकरण देण्यात आलेले आहे अशा आशयाची हमीपत्र प्रतिवर्षी साधारणपणे दि. ३१ मे पूर्वी मा. संचालक, तंत्र शिक्षण विभाग यांना सादर करावी लागतात.

खालील विद्याशाखेअंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांचे प्रवेश हे केंद्रीय प्रवेश पद्धतीने मा. संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे यांच्यामार्फत केले जाते.

१) शिक्षणशास्त्र
२) शारीरिक शिक्षणशास्त्र
३) विधी

मा. संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे यांच्या कार्यालयासही उपरोक्त नमूद अभ्यासक्रम ज्या महाविद्यालयांमध्ये राबविले जातात त्या महाविद्यालयांतील अभ्यासक्रमांना संलग्नीकरणाचे नूतनीकरण देण्यात आलेले आहे अशी हमीपत्रे संबंधित कार्यालयास केंद्रीय प्रवेश पद्धती सुरू करण्यापूर्वी सादर करावी लागतात.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता विद्यापीठाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे :

व्यवस्थापनशास्त्र, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र व विधी या विद्याशाखांतील अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरणाच्या नूतनीकरणाची प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून फक्त एका वर्षापुरतीच राबविण्यात येणार आहे. अभियांत्रिकी विद्याशाखेसाठी पूर्वीपासूनच एका वर्षासाठी संलग्नीकरणाची प्रक्रिया राबविण्यात येत आहेच.

उपरोक्त नमूद विद्याशाखांअंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरणाचे नूतनीकरणाचे अर्ज हे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून फक्त एकाच वर्षापुरते स्वीकारण्यात येतील याची नोंद घेऊन त्याप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने दि. ३१ ऑक्टोबर, २०१६ पूर्वी अर्ज करण्यात यावेत.

| | | |
|---|---|---|
| गणेशखिंड, पुणे-४११००७ | ) | |
| जा.क्र. शैपा/३१६४/२०१६ | ) | संचालक |
| दिनांक : १८ ऑगस्ट, २०१६ | ) | (म.वि.वि.मं.) |